दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.९ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १९२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 9 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 192 | Pages 4 | Rate 4 Rs




# विश्वविजेता भारत

## टी-२० क्रिकेटमध्ये भारत तिसऱ्यांदा विश्वविजेता, यजमान भारताने घरच्या मैदानावर जिंकला वर्ल्डकप

दैनिक वादळ वार्ता

**अहमदाबाद : अहमदाबादच्या जगातल्या सगळ्यात मोठ्या स्टेडियमवर सव्वा लाख चाहत्यांच्या साक्षीने भारतीय संघाने दणदणीत वर्चस्वासह टी-२० वर्ल्डकपच्या अंतिम लढतीत न्यूझीलंडचा धुव्वा उडवत जेतेपदावर नाव कोरले. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने जेतेपदाची कमाई केली होती. आतापर्यंत कोणत्याच संघाला जेतेपद कायम राखता आले नव्हते. दोन वर्षांपूर्वी रोहितसेनेचा भाग असणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने अंतिम मुकाबल्यात प्रथम फलंदाजी करताना २५५ धावांचा डोंगर रचला. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या आघाडीच्या शिलेदारांनी वादळी अर्धशतकी खेळी साकारत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या डोंगरासमोर खेळताना न्यूझीलंडने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. तिलक वर्माने लॉकी फर्ग्युसनचा झेल घेताच खेळाडूंनी एकच जल्लोष केला. न्यूझीलंडचा डाव १५९ धावांतच आटोपला.**



अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सलामीवीर अभिषेक शर्माने अवघ्या २१ चेंडूंत ५२ धावांची (६ चौकार, ३ षटकार) स्फोटक खेळी करत पॉवरप्लेमध्ये भारताला ९२ धावांपर्यंत मजल मारून दिली. त्यानंतर संजू सॅमसनने आपल्या फॉर्मचे सोने करत ४६ चेंडूंत ८९ धावांची (५ चौकार, ८ षटकार) मॅरेथॉन खेळी केली. त्याला इशान किशनने (२५ चेंडूंत ५४ धावा) मोलाची साथ दिली. अखेरच्या षटकात शिवम दुबेने ८ चेंडूंत २६ धावा कुटल्यामुळे भारताने २० षटकांत ५ बाद २५५ धावांचे हिमालयासारखे लक्ष्य न्यूझीलंडसमोर ठेवले. २५६ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. जसप्रीत बुमराहने आपल्या ४ षटकांत केवळ १५ धावा देत ४ बळी टिपले आणि किवींच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. फिरकीपटू अक्षर पटेलने २७ धावांत ३ महत्त्वाचे मोहरे टिपून त्याला उत्तम साथ दिली. न्यूझीलंडकडून केवळ टिम सीफर्टने (२६ चेंडूंत ५२ धावा) थोडा प्रतिकार केला, मात्र इतर फलंदाजांनी भारतीय गोलंदाजीसमोर नांगी टाकली. डॅरिल मिचेल (१७) आणि मिचेल सँटनर (४३) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण वाढत्या धावगतीचा दबाव त्यांना सोसता आला नाही. संपूर्ण न्यूझीलंडचा संघ १९ व्या षटकात १५९ धावांवर गारद झाला.

# गंगा माऊली शुगरने केला ५ लाख ५० हजार गाळपाचा टप्पा पूर्ण


## जिल्ह्यात उत्कृष्ट ११ चा साखर उतारा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात देखील चांगला साखर कारखाना निर्माण व्हावा व सर्वांना हक्काचा कारखाना वाटावा ही मनोमन असणारी शेतकऱ्यांची इच्छा व गरज लक्षात घेता बीड जिल्ह्याचे सुपुत्र लक्ष्मण मोरे यांनी मागच्या तीन वर्षांपूर्वी गंगा माऊली शुगर सुरू केला आणि शेतकऱ्यांना देखील आशेचा किरण पाहायला मिळाला व आज गंगा माऊली शुगर हा कारखाना शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र झाला असून या गळीत हंगामात ५ लाख ५० हजार ८८ गाळप करून ११ चा उत्कृष्ट साखर गाळप उतारा कारखान्याने स्थापीत केला.याबद्दल सर्व ऊस उत्पादक शेतकरी, सभासद व कर्मचारी यांच्यामध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांचा हिताचा कारखाना म्हणून आता गंगा माऊली शुगर या कारखान्याने अल्पावधीत आपली ओळख निर्माण केली आहे केवळ साखरेचे गाळप करून इतर कारखान्याच्या बरोबरीने हा कारखाना



उसाला भाव देत असून इतर कोणतेही उत्पादन नसल्याने केवळ आणि केवळ साखर उत्पादना वर हा भाव देणे तसे सोपे नाही मात्र लक्ष्मणराव मोरे यांनी सुरुवातीलाच सांगितले होते की,या भागातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरच हसू हाच आमचा नफा असेल आणि अगदी त्याच प्रमाणे शेतकरी वर्ग या कारखान्याच्या बाबतीत आनंदी आहे.

**पंधरा दिवसाला बील देणारा एकमेव कारखाना**

या कारखान्याने एक वैशिष्ट्य अगदी पहिल्या गळीत हंगामापासून जपले आहे ते म्हणजे दर १५ दिवसाला शेतकऱ्यांना उसाचे बील दिले आहे.आज देखील २८ फेब्रुवारी पर्यंतचे बील देऊन कारखान्याने शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला आहे.हा कारखाना शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र रहावा यासाठी लक्ष्मणराव मोरे हे प्रयत्न करत आहेत त्यांच्या सोबत या कारखान्याच्या बाबतीत आदित्य पाटील,राहुल सोनवणे,हनुमंत काका मोरे,प्रविण मोरे, अविनाश मोरे यांचेही प्रयत्न मोठे मोलाचे असून यांचेसह कर्मचारी यांनी देखील कारखान्याचे गाळप मोठ्या ताकतीने सर्वांनी मिळून केले व आज रोजी ५ लाख ५० हजार ८८ गाळप करून गंगा माऊली शुगर हे गाळप बंद करत आहे.

# आनंद ग्रामीण विकास व स्वानंद सार्वजनिक वाचनालयात जागतिक महिला दिन संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिन महिला मेळावा, महिला वाचक मेळावा, ग्रंथप्रदर्शन,कविता लेखन व वाचन स्पर्धा,क्रिकेट स्पर्धा घेवून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.सर्व प्रथम मयुरी गायकवाड, वेदिका गायकवाड, अनुश्री गायकवाड, वेदिका गायकवाड, श्रावणी पौळ,अक्षरा सौदागर,अंकिता गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजामाता व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले व विविध कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी अक्षरा सौदागर या होत्या.

सकाळी ९ ते ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले. सकाळी ९ ते १० या वेळात कविता लेखन व वाचन स्पर्धा घेण्यात आल्या.त्यानंतर १० ते १२ या वेळात महिला मेळावा व महिला वाचक मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात वेदिका गायकवाड,मयुरी गायकवाड,श्रावणी पौळ, अनुश्री गायकवाड, वेदिका गायकवाड, अंकिता गायकवाड व दोन्ही संस्थेचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक,महाराष्ट्रा तील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा



गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप अक्षरा सौदागर यांनी केला.कविता लेखन व वाचन स्पर्धेतही अक्षरा सौदागर,वेदिका गायकवाड,मयुरी गायकवाड,श्रावणी पौळ, सोहम गायकवाड,अनुश्री गायकवाड,विक्रम गायकवाड,आनंद गायकवाड,यशवंत सौदागर,बालाजी टिंगरे, समर्थ गायकवाड,अमर पौळ यांनी स्वरचित कविता लेखन व वाचन केले.त्यानंतर १२ ते २ या वेळात मुलांसाठी क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या.

नंतर ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले.५ वाजता बक्षीस वितरणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यातआला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# जागतिक महिला दिनी साने गुरुजी निवासी विद्यालयातील मुलींना एचपीव्ही लसीकरण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.८ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्रात एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली.त्याच दिवशी केज जिल्हा उप रुग्णालयाच्या वतीने साने गुरुजी निवासी विद्यालयावर वर्ष १४ पूर्ण केलेल्या व पंधरा वर्षे पूर्ण न केलेल्या मुलींना देण्यात आली. सदर एचपीव्ही लस म्हणजे ह्युमन पॉपिलोमा व्हायरस या विषाणूमुळे प्रजनन मार्गातील एक सामान्य संसर्ग होतो. गर्भाशय मुखाच्या (cerivix) कर्करोगाच्या बहुतांश रुग्णांमध्ये एचपीव्ही जबाबदार असतो.हा कर्करोग भारतीय महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगां पैकी दुसऱ्या क्रमांकाचा कर्करोग आहे या लसी मुळे गर्भाशय मुखाचा कर्करोग कमी होण्यास मदत होणार आहे.दि.८ मार्च रोजी उपजिल्हा रुग्णालय केज येथे साने गुरुजी निवासी विद्यालयातील १३ मुलींना लसीकरण करून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी लसीकरणासाठी उप जिल्हा



रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे,डॉ.इंगोले,संकुलाच्या प्राचार्य डॉ.कविता गीते - कराड मॅडम उपस्थित हे होते.तसेच या मोहिमेत सहभागी रुग्णालयाच्या डॉ.केशव इंगोले,डॉ. संजय पुसदेकर,डॉ. कृष्णा म्हात्रे,श्रीमती आशा पौळ,श्री.तळेकर, श्री.महाजन विजय,नर्स व ब्रदर्स यांनी लस देण्याचे काम यशस्वी रित्या पूर्ण केले.

# कर्ज फेडण्यासाठी राज्यात १९ शेतकऱ्यांनी किडणी विकल्याचे समोर आले तरी सरसकट कर्ज माफी नाहीच,सरकारने कर्ज माफीच्या घोषणा करून शेतकऱ्यांची फसवणुक करू नये-भाई मोहन गुंड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले असताना शासनाकडून पुन्हा एकदा कर्जमाफी आणि अनुदानाच्या घोषणा करण्यात येत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्या तील शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा आणि नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड करण्यासाठी राज्यात तब्बल १९ शेतकऱ्यांनी किडणी विकल्या आहेत,तरी पण आपण सरसकट कर्जमाफी देत नाहीत हे शेतकऱ्याचे दुर्दैव आहे, किती समीती गठीत करणार ? शेतकऱ्यांचे वजोवाटोळे करण्याचा सरकारने विडाच उचला आसेल तर आम्ही रस्त्यावर उतरु असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे.

आधीही सरकारने अशा प्रकारच्या घोषणा झाल्या होत्या आणि प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालाच नाही,ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे.पूर्वी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात हजारो शेतकरी त्या योजनेपासून वंचित राहिले.त्यामुळे सध्याची घोषणा देखील शेतकऱ्यांच्या नजरेत विश्वासार्ह वाटत नाही. याबद्दल शंका निर्माण होत आहे.खरे पाहिले तर शासनाचे धोरण शेतकऱ्यांना कर्जघेण्यास प्रवृत्त करणारे झाले आहे.कर्ज काढा आणि नंतर कर्जमाफीसाठी भिक मागा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.रोज शेतकरी मृत्यूला कवटाळत आहेत शेतकरी कर्जबाजारी होऊच नयेत यासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्या ऐवजी केवळ कर्जमाफी च्या घोषणा करून तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.ही स्थिती म्हणजे ऋण काढून दिवाळी साजरी करणे या म्हणी प्रमाणे आहे.आज जगातील अनेक देश शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान,बाजारपेठ व्यवस्थापन आणि उत्पादन खर्च कमी करण्यावर भर देत आहेत.मात्र भारतात अजूनही शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे उत्तर कर्जमाफी आणि अनुदान यामध्येच शोधले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचीखरी प्रगती होत नाही,उलट त्यांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत जातात. खरे तर शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने खालील बाबींवर भर देणे अत्यंत आवश्यक आहे शेतीमालाला योग्य आणि हमीभाव निश्चित करणे, उत्तम आणि परवडणारी खते व बियाणे उपलब्ध करून देणे शेतकऱ्यांच्या मालासाठी मजबूत बाजारपेठ निर्माण करणे, शेती उत्पादन साठवणूक व प्रक्रिया उद्योग वाढवणे थेट ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहोचवण्याची व्यवस्था उभी करणे शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफी देण्या पेक्षा त्यांना स्वाभिमानाने शेती करता येईल अशी व्यवस्था उभी करणे हे शासनाचे खरे कर्तव्य आहे.अन्यथा कर्जमाफी च्या घोषणा या केवळ राजकीय दिखावा करू नका,सरसकट कर्ज माफी द्या,अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जन आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे.



# संपादकीय

## कामगारांच्या जीवावर उठलेले स्फोटक कारखाने

कळमेश्वर तालुक्यात राउळगाव येथील एसबीएल स्फोटक कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटाने संपूर्ण परिसर हादरून गेला. या दुर्घटनेत १९ कामगारांचा मृत्यू झाला असून अनेक जखमी अद्याप मृत्यूशी झुंज देत आहेत. वारंवार घडणाऱ्या अशा स्फोटांमुळे स्फोटक उद्योगातील सुरक्षा आणि प्रशासनाच्या जबाबदारीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.रविवारची सकाळ उजाडली ती नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर तालुक्यातील राउळगाव येथील एसबीएल या स्फोटकांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटाच्या बातमीने. सकाळी ६ ते ७ च्या सुमारास या कारखान्यात स्फोटकांच्या साठ्यामध्ये स्फोट झाले. त्यात कारखान्याची इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी तर पडलीच, पण कारखान्यात कार्यरत असलेल्या १९ श्रमिकांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे, तर २२ श्रमिक गंभीररीत्या जखमी असून ते अद्यापही मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नागपूर जिल्हा हादरला, तर जिल्हा प्रशासन क्शन मोडवर आले आहे.या स्फोटाची बातमी कळताच प्रशासन सतर्क झाले असून प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्याचबरोबर या परिसराचे आमदार चरणसिंह ठाकूर, तसेच माजी आमदार आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख, जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांनीही घटनास्थळी धाव घेतली. काही वेळाने नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे देखील घटनास्थळी पोहोचले होते. चंद्रशेखर बावनकुळे हे तेव्हापासून सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. या परिसरात असे स्फोटकांचे ११ पेक्षा अधिक कारखाने असून गेल्या दीड वर्षांत इथे झालेल्या २३ स्फोटांमध्ये जवळजवळ ४३ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे, तर अनेक कामगार कायमचे जायबंदी झालेले आहेत. गेल्या सप्टेंबरमध्ये येथून जवळच असलेल्या कोंढाळी परिसरातील सोलार एक्सप्लोजिव्हज या कारखान्यात मोठा स्फोट झाला होता, तर वर्षभरापूर्वी जवळच कोतवालवाडी येथे असलेल्या एका स्फोटकांच्या कारखान्यातही असाच स्फोट झाला होता आणि त्यात काही मजूर मृत्युमुखी पडले होते, तर काही जायबंदी सुद्धा झालेले आहेत. एकूणच या परिसरात ही स्फोटांची मालिका सातत्याने सुरूच आहे, परिणामी जनजीवन विस्कळीत होत आहे. मात्र प्रशासन याबाबत काय करते आहे हा देखील प्रश्न निर्माण होतो आहे. रविवारी घडलेल्या घटनेत एसबीएलचे मालक संजय चौधरी आणि आलोक चौधरी यांच्यासह २१ जणांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. यात १० व्यक्तींना अटक झाली असली तरी मालक मात्र फरारच आहे. कारखान्याचे प्रबंध संचालक मात्र अटकेत असून त्यांच्यासह सर्व १० आरोपींना सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना एसबीएल कंपनीच्या वतीने प्रत्येकी ७५ लाख रुपये, राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी ५ लाख रुपये, तर केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येकी २ लाख रुपये अशी एकूण ८२ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या प्रकरणात जखमी झालेल्यांना कंपनीकडून प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची माहिती देखील कंपनीच्या वतीने सांगण्यात आली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच नागपूरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली असून जखमींच्या नातेवाइकांना दिलासा देण्याचे कामही केले आहे.

अनेक कुटुंबांमधील कर्ता पुरुष अपघातात दगावला, तर १४ महिला कामगार देखील या स्फोटात जळून खाक झाल्या. या महिलांच्या चिमुकल्यांचा आक्रोशही बघवत नव्हता. सर्व मृतदेह जळाल्याने ते ओळखणे देखील कठीण झाले होते. शेवटी दोन दिवसांनंतर सर्व मृतदेहांची डीएनए चाचणी करून नंतर ते कुटुंबीयांच्या हवाली करण्यात आले. बहुतेक जखमी कामगारांना नागपूरच्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले असून तिथेच त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे तिथे देखील नातेवाइकांनी गर्दी केली आहे. वस्तूतः स्फोटकांचा कारखाना हा एक जिवंत बॉम्बच असतो. इथे पुरेपूर सुरक्षा व्यवस्था ठेवणे गरजेचे असते. तसेच इथे काम करणाऱ्या कामगारांना देखील पुरेसे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. मात्र गेल्या दीड वर्षांत झालेल्या २३ स्फोटांच्या घटनांमध्ये कारखान्यात कामगारांना असे प्रशिक्षण दिले नसल्यामुळे आणि तिथे पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवली नसल्यामुळे हे स्फोट झाले असल्याचे सांगितले जात आहे.वस्तुतः नागपुरात डायरेक्टोरेट ऑफ एक्स्प्लोजिव्जचे मुख्यालय आहे. त्यामुळे इथे पुरेशी काळजी घेतली जाणे गरजेचे होते. मात्र त्यांचे दुर्लक्ष झालेच पण जिल्हा प्रशासनाचे देखील अक्षम्य दुर्लक्ष झालेले दिसते. मिळालेल्या माहितीनुसार येत्या सोमवारी सर्व घटकांच्या स्फोटकांच्या कारखान्यांचे संचालक, वरिष्ठ अधिकारी तसेच शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी यांची एक संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या स्फोटाचे पडसाद राज्याच्या विधिमंडळात देखील बुधवारी उमटले. विरोधी पक्षांनी तर याबाबत सरकारला जाब विचारलाच पण सत्ताधारी आमदारांनी देखील प्रशासनाच्या दुरवस्थेबद्दल तक्रारी केल्या. आता मानवाधिकार आयोगाने देखील या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य सरकारला दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान या प्रकरणात आतापर्यंत अकरा आरोपींना अटक करण्यात आली असून ते पोलीस कोठडीत आहेत, तर उर्वरित दहा आरोपी फरार घोषित करण्यात आले आहेत. त्यांच्याबाबत लुकाऊट नोटीस देखील जारी करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. मात्र घटना घडताच हे आरोपी पोलीस आणि प्रशासनाला गुंगारा देऊन इथून पळून गेले आहेत हे निश्चित. स्फोटक निर्मितीच्या कारखान्यात असे स्फोट झाले तर कारखान्याचे तर नुकसान होतेच आणि तिथे काम करणाऱ्या कामगारांचे नाहक बळी जातात. मात्र त्याचबरोबर आजूबाजूच्या परिसराला देखील त्याचे धक्के बसतात. त्यामुळे अशा कारखान्याच्या आसपासचे नागरिक कायम दहशतीतच जगत असतात. हे लक्षात घेऊन आता प्रशासनाने नागरी सुरक्षेचाही विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नवीन कारखाना आला की, त्या परिसरातील बेकारांना रोजगार मिळतो आणि परिणामी त्या परिसराचे दरडोई उत्पन्न देखील वाढते. मात्र जर असे प्रकार होऊन नाहक जीव जाणार असतील तर असा विकास काय कामाचा असाही प्रश्न विचारला जात आहे. या घटनेनंतर एसबीएल कंपनीला प्रशासनाकडून टाळे ठोकण्यात आले असून त्यांचा स्फोटक निर्मितीचा परवाना देखील रद्द करण्यात आला आहे. ही घटना घडून गेल्यावर अशी कारवाई करण्यापेक्षा आधीच दुर्घटना कशी टाळता येईल यावर उपाययोजना करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची शक्ती आहे-डॉ.आदिती सारडा

## डॉ.आदिती सारडा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्काराच्या योग्य मानकरी-पत्रकार संतोष मानूरकर



दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रामध्ये डॉ. आदिती सुभाष सारडा यांचे काम निश्चितच कौतुकास्पद आहे. बीड जिल्ह्याचे सर्वांगीण वैभव वाढवण्यामध्ये सारडा परिवाराचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याने आज जागतिक महिला दिनी डॉ. आदिती सारडा यांना पत्रकार संघाच्या वतीने दिलेला फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार योग्य आणि कौतुकास्पद आहे असे स्पष्टमत ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर यांनी व्यक्त केले. तर स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची शक्ती आहे. तिचा सन्मान आणि समानता हीच खऱ्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. जर महिलांच्या हातात सत्ता म्हणजेच प्रशासन असेल तर सुशासन निर्माण होते, एक चांगली शिस्त लागते हे मी आदित्य ग्रुपच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादामुळे करू शकले. असा विश्वास सत्कारमूर्ती डॉक्टर आदिती सारडा यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केला.

जागतिक महिला दिनानिमित्त रविवार दिनांक ८ मार्च रोजी बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने सामाजिक जाणीव ठेवणाऱ्या उपक्रमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. बेघर निवारा केंद्रातील पुनर्वसित झालेल्या ६ महिलांना प्रमुख अतिथी डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांच्या शुभहस्ते साडीचोळी, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.त्याचबरोबर पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा सन्मानाचा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार २०२६ हा डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांना ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर आणि कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार वैभव विवेक स्वामी, पत्रकार शेख आयेशा, सामाजिक कार्यकर्त्या सौ मनिषा स्वामी, काळजीवाहक छाया सरोदे तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन शानदार गुणगौरव करण्यात आला.यावेळी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील प्रत्येक लाभार्थ्यांच्या व्यथा ऐकून संवेदनशील झालेल्या सत्कारमूर्ती डॉ. आदिती सारडा यांनी भावनिक होऊन आपले अनमोल असे विस्तृत मार्गदर्शन केले. त्या पुढे म्हणाल्या की,आज मला या ठिकाणी सत्काराच्या निमित्ताने येण्याची संधी मिळाली. माझ्या डोळ्याने येथील व्यथा बघितल्यावर माझी समाजाकडे बघण्याची दृष्टी खऱ्या अर्थाने बदलली आहे.आम्ही जे काही काम विद्यार्थ्यांसाठी करतो त्यावेळी आमचे व्यक्तिगत काम आम्हाला बाजूला ठेवावे लागते आणि प्राधान्य विद्यार्थ्यांना द्यावे लागते. त्यामुळे आम्ही खूप त्याग करतो असे कधी कधी वाटत होते. पण आमच्या पेक्षाही जास्त त्याग येथे काम करणाऱ्या आणि अशा पद्धतीने काम करणाऱ्या अनेकांचा आहे. त्यामुळे आज माझा सत्कार एका चांगल्या समूहामध्ये झाला. आणि या कार्यक्रमामुळे त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद निर्माण झाला यातच या उपक्रमाचे यश आहे. असे स्पष्ट करून त्या म्हणाल्या, पत्रकार वैभव स्वामी यांनी आज पुनर्वसित झालेल्या महिलांना माझ्या शुभहस्ते सन्मानित करून खऱ्या अर्थाने सामाजिकतेची जाणीव करून दिली आहे. आजचा हा सोहळा माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला आहे,अशी भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक राजू वैद्य यांनी सविस्तरपणे केले.तर सत्कारमूर्तींच्या व्यथा आणि बेघर निवारा केंद्राची यशस्वी गाथा मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे यांनी विस्तृतपणे अंगावर शहारे आणणाऱ्या शब्दांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास पत्रकार, प्रतिष्ठित, शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची गोड सांगता झाली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार वैभव स्वामी यांनी पुढाकार घेतला.

### डॉ.आदिती सारडा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्काराच्या ठरल्या मानकरी..!

शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आदिती सारडा यांना यावर्षीचा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. बीड शहरात आरोग्य व कृषी क्षेत्रातील शैक्षणिक दालने उपलब्ध करून देत आदित्य शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

### पुनर्वसित महिलांचा गुणगौरव...!

घरातून बेघर झाल्यानंतर ज्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राने आश्रय दिला. त्या केंद्रात नव्याने जगण्याची ऊर्जा घेऊन ज्या महिला स्वतःच्या पायावर उभा राहून बेघर केंद्रातून बाहेर पडल्या आणि पुनर्वसित होऊन समाजामध्ये स्वाभिमानाने जगू लागल्या आहेत. यामध्ये प्रातिनिधिक स्वरूपामध्ये आशाबाई शिवाजी आव्हाड, रईसा महमूद पठाण, संगीता राजेंद्रसिंग जव्हेरी, मनीषा वनवे, शेख इसरत शेख मेहमूद, बेबीताई गणपत शेंडगे या महिलांना नवीन साडीचोळी, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.

# बीडमध्ये ‘महिला मॅरेथॉन’ उत्साहात; जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम

## महिलांचा शंभर टक्के सहभाग ही बीडसाठी अभिमानाची बाब-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ‘महिला मॅरेथॉन’ स्पर्धा रविवार दि.८ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शालेय विद्यार्थिनींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला.




महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जात पडताळणी विभागाचे सहाय्यक उपायुक्त उमेश सोनवणे तसेच तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदीप रोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला दिनानिमित्त मॅरेथॉनसारख्या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, विविध ठिकाणी आयोजित मॅरेथॉनमध्ये महिलांचा सहभाग तुलनेने कमी असतो, मात्र बीडमध्ये शंभर टक्के महिलांचा सहभाग दिसून येणे ही अभिमानाची बाब आहे. तसेच त्यांनी बीड जिल्ह्यातील बालविवाह आणि मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रश्नावरही प्रकाश टाकत समाजाने याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.अशा स्पर्धांमधून महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे त्यांनी नमूद केले.सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मॅरेथॉनला सुरुवात झाली. नगर रोड मार्गे पुन्हा सामाजिक न्याय भवन असा सुमारे ७ कि.मी.चा मार्ग स्पर्धकांनी उत्साहाने पार केला. १० ते १८ वर्षे आणि १८ वर्षांवरील अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली. दोन्ही गटांत चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली.स्पर्धेच्या शेवटी विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये गट-अ (१० ते १८ वर्षे) या गटात कु.दिव्या राठोड हिने २९ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.अमृता वायकर तर तृतीय क्रमांक कु.अक्षरा शेलार यांनी मिळवला. त्यांना अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिकांसह सन्मानित करण्यात आले.गट-ब (१८ वर्षांवरील) या गटात कु.परिमला बाबर हिने ३२ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक मिळवला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.ज्ञानेश्वरी गुजर, तर तृतीय क्रमांक कु.कांचन शिंदे यांनी मिळवला. त्यांनाही अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासन, योगा ग्रुप, बालाघाट ग्रुप, तसेच तुलसी शैक्षणिक समूहातील विविध युनिटचे प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी.राऊत, प्रा.डी.जी निकाळजे, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.प्रकाश ढोकणे, उमा जगतकर, डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मॅरेथॉनला शहरातील नागरिक, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प-उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

राज्याचा आज सादर झालेला अर्थसंकल्प हा विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करणारा दूरदृष्टीपूर्ण, सर्वसमावेशक आणि व्हिजन डॉक्युमेंटची प्रभावी अंमलबजावणी करणारा असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली.मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प आदरणीय अजितदादा पवार यांना समर्पित केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. तसेच आदरणीय दादांचे उचित स्मारक उभारण्याबरोबरच त्यांच्या नावाने ‘गतिमान नागरी सेवा पुरस्कार’ सुरू करण्याची घोषणा ही दादांना अर्पण केलेली योग्य श्रद्धांजली असल्याचे त्यांनी नमूद केले.प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार प्रमुख आधारस्तंभांवर राज्याचा विकास साधण्याची दिशा या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसून येत असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या. आदरणीय अजितदादा पवार यांनी मांडलेल्या प्रगत आणि विकासाभिमुख संकल्पनांशी सुसंगत अशी विकासाची दिशा या अर्थसंकल्पातून पुढे आली असून महाराष्ट्राच्या प्रगतीचा वेग कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.राज्याच्या विकासात शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिक यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. विशेषतः शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. कृषी क्षेत्राला बळकटी देणे, पायाभूत सुविधा मजबूत करणे, पर्यटन, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.भांडवली खर्चात सुमारे २० टक्क्यांची भरीव वाढ करण्यात आल्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती मिळणार असून महाराष्ट्र देशातील अग्रगण्य अर्थव्यवस्था म्हणून अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दिव्यांग बांधवांसाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत एक टक्का निधी राखून ठेवण्याचा निर्णय हा संवेदनशील धोरणाचे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.पुणे जिल्ह्यातील वढू-तुळापूर येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान स्थळाच्या स्मारकाचे काम यावर्षी पूर्ण करण्यात येणार असून सातारा येथील अजिंक्यतारा किल्ला आणि संगम माहुली विकास आराखड्यासाठीही विशेष तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.महिलांच्या सक्षमीकरणासाठी ‘लाडकी बहीण’ योजनेसाठी भरीव तरतूद, एकल महिलांच्या कल्याणासाठी धोरण तसेच ‘लखपती दीदी’ उपक्रमाद्वारे महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी ठोस पावले उचलण्यात आली आहेत. तसेच कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर वाढविण्यासाठीही अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.मुंबईच्या धर्तीवर पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे ग्रोथ हब उभारण्याची योजना, अमृतकालीन रस्ते विकास योजना आणि मेट्रो प्रकल्पांच्या माध्यमातून पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.याशिवाय राज्याच्या आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीत बीड जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला असून तेथील आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी बृहद आराखडा तयार करण्यात येणार असून बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी ३६० खाटांचे नवे रुग्णालय, नर्सिंग कॉलेज आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

## आजबे-भवर परिवाराचा दिमाखदार लग्नविधी सोहळा; सुयोग्य नियोजनामुळे ठरला आदर्श विवाह

# मान्यवरांच्या उपस्थितीत शिवनाथ-तन्वी यांचा शुभविवाह संपन्न; मनोज दादा जरांगे पाटील व आ.सुरेश आण्णा धस यांच्यासह अनेक मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शिराळ येथील आजबे परिवार व भवरवाडी (किन्ही) येथील भवर परिवार यांचा प्रतिष्ठेचा व बहुचर्चित लग्नविधी सोहळा गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात पारंपरिक थाटात, दिमाखदार वातावरणात आणि उत्साहपूर्ण उपस्थितीत संपन्न झाला. आकर्षक सजावट, मंगलाष्टकांचा गजर आणि नातेवाईकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर आनंदोत्सवात न्हाऊन निघाला होता.

शिराळ येथील श्री. गौतम राधाकिसन आजबे यांचे द्वितीय चिरंजीव चि. शिवनाथ आणि भवरवाडी (किन्ही) येथील श्री. भास्करराव नामदेव भवर यांची सुकन्या चि. सौ.कां.तन्वी यांचा शुभविवाह दुपारी १२.५५ वाजता अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडला. उपस्थित मान्यवर, नातेवाईक आणि मित्रपरिवार यांच्या शुभआशीर्वादात नवदांपत्याने नव्या आयुष्याची सुरुवात केली.

विवाहस्थळी करण्यात आलेली आकर्षक सजावट, पाहुण्यांसाठी केलेली उत्तम व्यवस्था, तसेच शिस्तबद्ध नियोजन यामुळे उपस्थित पाहुण्यांनी आयोजकांचे मनापासून कौतुक केले. कुटुंबातील स्नेह, आपुलकी आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवणारा हा विवाहसोहळा उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला.

मान्यवरांच्या शुभेच्छांनी लाभली विशेष प्रतिष्ठा

या लग्नविधी सोहळ्यास आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री आ. सुरेश आण्णा धस यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून नवदांपत्याला शुभेच्छा दिल्या. मराठा आंदोलनाचे नेते मनोज दादा जरांगे पाटील यांनीही ऑनलाईन शुभेच्छा देत नवदांपत्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मंगलकामना व्यक्त केल्या.तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहून माजी आमदार साहेबरावजी दरेकर (नाना) यांनी नवदांपत्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी देविदास आबा धस, युवा नेते जयदत्त भैय्या धस, संग्राम भैय्या आजबे,माजी सभापती उद्धव बापू दरेकर,विजय गोल्हार,सतिष आबा शिंदे,माजी सभापती बद्रीनाथ जगताप,ड.बाळासाहेब झांबरे, रमजान तांबोळी,गंगा आबा आजबे, यश भैय्या आजबे,अनील ढोबळे, योगेश भंडारी,राम मधुकर,संजय शेठ मेहेर,सुनील शेठ मेहेर, मुथ्था साहेब,ड.नरवडे,नामदेव राऊत, अशोक पोकळे,पंडित अण्णा पोकळे,ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल भाऊ सहस्रबुद्धे,ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,लोकशाही पत्रकार संघ जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे,पत्रकार प्रवीण पोकळे, पत्रकार शरद तळेकर यांच्यासह अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हळद-साखरपुड्याचा रंगतदार सोहळा

विवाहापूर्वी दि. ४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.१५ वाजता विवाहस्थळी हळद व साखरपुडा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पारंपरिक गीतांचा गजर, कुटुंबीयांचा उत्स्फूर्त सहभाग आणि आनंददायी वातावरणामुळे हा सोहळा उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला.

विवाहसोहळ्याची ठळक वैशिष्ट्ये

* पारंपरिक विधींसह दिमाखदार पद्धतीने पार पडलेला लग्नविधी
* मंगलाष्टकांच्या गजरात रंगलेला उत्साहपूर्ण सोहळा
* आकर्षक सजावट व पाहुण्यांसाठी उत्कृष्ट व्यवस्था
* नातेवाईक व मित्रपरिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती
* मान्यवरांच्या शुभेच्छांनी लाभलेली विशेष प्रतिष्ठा
* कुटुंबातील स्नेह, एकोपा व सामाजिक ऐक्याचे दर्शनसुयोग्य नियोजनामुळे मिळाले कौतुक

या विवाहसोहळ्याचे नियोजन श्री. गौतम नाना आजबे,माजी सरपंच बंडू आबा आजबे,सरपंच भरत भवर,हरिष भवर,संजय दादा आजबे,अंकुश आजबे व समस्त आजबे परिवार यांनी अत्यंत सुयोग्यरीत्या केले. उत्कृष्ट आदरातिथ्य, शिस्तबद्ध व्यवस्था आणि नियोजनामुळे उपस्थितांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

या मंगल प्रसंगामुळे आजबे व भवर परिवारातील नातेसंबंध अधिक दृढ झाले असून दोन्ही कुटुंबांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. उपस्थितांनी नवदांपत्य शिवनाथ-तन्वी यांच्या सुखी, समृद्ध आणि उज्ज्वल वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी हातोटे सर, दाणी सर व शेंडगे सर यांनी केले, तर उपस्थित मान्यवर व पाहुण्यांचे आभार श्री. गौतम नाना आजबे यांनी मानले.




### स्त्रीशक्तीच्या भरारीपुढे गगनही ठेंगणे-महिला दिनानिमित्त अँड मंजू आशिष ताजणे यांचे प्रतिपादन

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांच्या सक्षमीकरण समता आणि हक्कांविषयी व्यक्त केले ठाम प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कोरपना दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिलांच्या सन्मानाचा, संघर्षाचा आणि कर्तृत्वाचा गौरव करणारा दिवस असल्याचे प्रतिपादन अँड मंजू आशिष ताजणे यांनी केले. महिला सक्षमीकरण, समान हक्क आणि लिंग समानतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस जगभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, असेही त्यांनी नमूद केले.



स्त्री म्हणजे शक्ती, स्त्री म्हणजे प्रेरणा असे सांगताना त्या म्हणाल्या, तुझ्या उत्तुंग भरारीपुढे गगनही ठेंगणे भासावे, तुझ्या विशाल पंखाखाली विश्व व ते सारे वसावे या ओळी आजच्या स्त्रीशक्तीचे खरे चित्र उभे करतात. इतिहासाकडे पाहिले असता महिलांना अनेक वर्षे सामाजिक बंधने, असमानता आणि अन्यायाचा सामना करावा लागला. शिक्षण, रोजगार, राजकारण तसेच समाजातील निर्णय प्रक्रियेत महिलांना फारच कमी संधी दिल्या जात होत्या. मात्र काळाच्या ओघात महिलांनी या अडचणींवर मात करत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

आज महिला डॉक्टर, शास्त्रज्ञ, शिक्षक, पोलीस अधिकारी, सैनिक, खेळाडू, उद्योगपती, वकील आणि राजकीय नेते म्हणून देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. समाजाच्या प्रगतीचा खरा मापदंड म्हणजे त्या समाजातील महिलांची स्थिती आणि त्यांना मिळणारा सन्मान होय, असेही त्यांनी सांगितले.

महिला ही केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नसून समाजाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावणारी शक्ती आहे. त्यामुळे महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी ८ मार्च रोजी महिला दिन साजरा केला जातो. हा दिवस महिलांच्या संघर्षाची, धैर्याची आणि यशस्वी वाटचालीची आठवण करून देणारा आहे.

महिलांचा सन्मान आणि सशक्तीकरण हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी, सुरक्षित वातावरण आणि स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळाले, तर समाज अधिक प्रगत आणि समृद्ध होईल. त्यामुळे महिला दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून महिलांच्या समान हक्कांसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा देणारा दिवस असल्याचेही अँड मंजू आशिष ताजणे यांनी स्पष्ट केले.

# कस्तुरबा टॉकीज मालाड ला' द केरला स्टोरी २' या चित्रपटाचे विशेष आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मालाडमध्ये गेले दोन दिवस, इनॉर्बिट मॉल येथे आणि काल कस्तुरबा टॉकीज येथे 'द केरला स्टोरी २' या चित्रपटाच्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन माझ्या आणि लव जिहाद वर प्रखरपणे काम करणाऱ्या प्रीती राऊत यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आले.




या चित्रपटाचे आयोजन आम्ही समाजातील त्या कटू वास्तवावर प्रकाश टाकण्यासाठी केले, ज्याबद्दल अनेक लोक अजूनही असं काही होतच नाही असे म्हणत दुर्लक्ष करतात. मात्र प्रत्यक्षात देशातील लाखो मुली आणि लाखो परिवार लव्ह जिहादचे शिकार झाले आहेत. आपल्या मुली सुरक्षित राहाव्यात, कुटुंब सतर्क राहावे आणि समाजाने अशा घटनांकडे डोळसपणे पाहावे, हा या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी उपस्थित नागरिकांना संबोधित करताना भाजपा मुंबई प्रदेश महामंत्री विनोद शेलार यांनी नमूद केले की, कशा प्रकारे प्रेमाच्या नावाखाली गैर-मुस्लिम मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवले जाते, त्यांचा ब्रेनवॉश केला जातो आणि त्यानंतर त्यांना कोणत्या अंधकारात ढकलले जाते, हे सर्व द केरला स्टोरी २ या चित्रपटात दाखवले आहे. हा चित्रपट केवळ चित्रपट नसून समाजाला जागरूक करण्याचा एक प्रयत्न आहे. जे लोक म्हणतात की असं काही घडत नाही, त्यांनी हा विषय खुलेपणाने समजून घेण्याची गरज आहे. कारण अनेक वेळा वास्तव आपल्याला दिसत नाही म्हणून ते अस्तित्वात नसते असे होत नाही.

यापुढेही हा चित्रपट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि याद्वारे त्यांना जागरूक करण्याचे प्रयत्न आम्ही करणार आहोत. असे भाजपा मुंबई महामंत्री विनोद शेलार यांनी म्हटले असून सर्वांनी नक्कीच तो चित्रपट पाहावा. असे आवाहन केले

यावेळी माधवी भूता, दीपक जोशी, भारत लिंबाचिया, प्रीती गाडगीळ, दीप्ती सोमपुरा, संजय राठोड, सुनील सेठ, प्रदीप गौड, क्रांती शाव आणि धनंजय गुप्ता आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तहसीलदारांच्या आदेशास मंडळ अधिकाऱ्यांनी दाखवली केराची टोपली

दैनिक वादळ वार्ता
**हदगांव । प्रतिनिधी**

हदगांव तालुक्यातील काही ग्राम महसूल अधिकारी खासगी कार्यालय व खाजगी मदतनीसांचा वापर करीत असल्याच्या तक्रारीवर हदगाव तहसीलदारांनी चौकशीचे आदेश दिले असतानाही संबंधित मंडळ अधिकाऱ्यांनी या आदेशाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. तीन दिवसांच्या आत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते; मात्र तब्बल तीन महिने उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. हदगाव तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी खासगी कार्यालय चालवून खाजगी मदतनीसांच्या माध्यमातून कामकाज करत असल्याबाबत दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी आपले सरकार पोर्टलवर ऑनलाइन तक्रार दाखल करण्यात आली होती. ही तक्रार भारतीय मानवाधिकार परिषद या संघटनेचे नांदेड चे जिल्हाध्यक्ष संतोष डवरे यांनी केली होती. तक्रारीची दखल घेत तहसीलदारांनी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. सद्या तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान सुरू होणार आहे. त्याकरिता वेगवेगळ्या ठिकाणी विविध प्रकारच्या सेवा जनतेस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत पण या महत्वकांक्षी योजनेला ही कर्मचारी कसा प्रतिसाद देतात हे पाहणे गरजेचे आहे. शासन जनतेसाठी वेगवेगळे उपक्रम राबवत आहे परंतु राबवणारी यंत्रणा

कुठेतरी कमी पडत असल्याची खंत व्यक्त होत आहे.या चौकशीसाठी हदगाव, मनाठा, पिंपरखेड, तळणी, बरडशेवाळा, निवघा (बा), आष्टी व तामसा या आठ मंडळ अधिकाऱ्यांना तपास करून तीन दिवसांच्या आत अहवाल देण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. मात्र आदेशानंतरही संबंधित मंडळ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. तीन महिन्यांनंतरही कोणतीही चौकशी पूर्ण झालेली नसून अहवाल सादर करण्यात आलेला नाही. दरम्यान, या संदर्भात तक्रारदारानेसंबंधित मंडळ अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून चौकशीची विचारणा केली असता 'बघू करू' अशी टाळाटाळ करणारी भूमिका समोर आल्याचे सांगितले आहे. त्यामुळे तहसीलदारांच्या आदेशाची प्रत्यक्ष

अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. यामुळे तहसीलदारांचा मंडळ अधिकाऱ्यांवर कायदेशीर व प्रशासकीय वचक आहे की नाही, असा सवालही उपस्थित केला जात आहे. तालुक्यात यापूर्वीधरती आबा जनजागृती उत्कर्ष अभियानातही याच प्रकारे अनेक विभाग प्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी दांडी मारल्याची सिद्ध होऊनही अद्यापही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कार्यवाही झाली नाही त्यामुळे मात्र हदगाव तालुक्यात कोणतीही शासनाची योजना राबविताना तालुकाप्रमुखाचे आदेश

कर्मचाऱ्यांनी न पाळणे हा च तर अलिखित नियम बनला नाही ना...? अशी शंका आता निर्माण होऊ लागली आहे. याबाबत तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी सुद्धा लक्ष द्यावे अशी मागणी होत जोर धरू लागली आहे. अन्यथा तालुक्यातील जनतेचे अनेक कामे प्रलंबित राहतील यात तीळ मात्र ही शंका नसल्याची मत सर्वसामान्य जनता व्यक्त करू लागली आहे.

# शिवाजी विद्यालय,हंडरगुळीच्या १२ विद्यार्थ्यांना भारत स्काउट व गाईड संघटनेचा राज्यपुरस्कार



दैनिक वादळ वार्ता

उदगीर ता. किसान शिक्षण प्रसारक मंडळ. उदगीर द्वारा संचलित शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हंडरगुळी येथील १२ विद्यार्थ्यांना स्काऊट व गाईड चळवळीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एकूण १२ पैकी वीर सावरकर पथकातील ८ स्काऊटस व जिजामाता पथकातील ४ गाईडसना भारत स्काऊट व गाईड संघटनेचा राज्यस्तरीय राज्य पुरस्कार जाहीर झाला आहे. या विद्यार्थ्यांचा राज्यपालांच्या हस्ते गौरव होणार आहे. माने जीवन दत्ता, सुतार संघर्ष विलास, माने प्रेम गंगाराम, गायकवाड रोहीत दशरथ, कांबळे शिवम मच्छिंद्र, कांबळे सम्यक बालाजी, शेख मुज्जाफर मुक्तार, हेंगणे श्रेयस शिवसांब ,कारामुंगे तनुजा अरविंद, वाघमारे अस्मिता दिगांबर, खोडेवाड सानिका माधव, माने श्रुती गंगाराम यांची राज्यपुरस्कारासाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे पर्यवेक्षक स्काऊट मास्टर सुगावे बालाजी चंद्रकांत व गाईडर सौ. कनकुरे एम. एम. जिल्हा संघटक डॉ.शंकर चामे, स्काऊट गाईड कार्यालयातील सचिन सुरवसे, राधाकिशन जोगदंड,धोंडिराम पाटील, यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव ज्ञानोबा पाटील,सचिव पांडूरंग तुळशीराम शिंदे, सहसचिव गिरी हिरागिर सिद्धगिर, पाटील गुंडेराव भाऊराव, झोडगे ज्ञानदेव रामभाऊ, रामराव नारायणराव एकंबे, काकासाहेब गोविंदराव पाटील, भिमराव नरसिंगराव पाटील, महाराष्ट्र कर्नाटक एकीकरण समितीचे सचिव जिल्हा बिदर पृथ्वीराज अशोकराव पाटील,प्रशालेचे मुख्याध्यापक सय्यद आर.एम. व सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील पालक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

## नगरपरिषद चिमूर कडून शुभम पसारकर यांचा पर्यावरण दूत म्हणून गौरव पर्यावरण दूत म्हणून नेमणूक



दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**

शुभम पसारकर यांचा पर्यावरण दूत म्हणून नगरपरिषद चिमूर कडून गौरव करण्यात आला.हा गौरव त्यांच्या विशेष कामगिरी बाबत करण्यात आला आहे.चिमूर नगरपरिषदेच्या वतीने माझी वसूंधरा ६-० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी घेण्यात येत असलेल्या उपक्रमामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पर्यावरण दूत म्हणून नेमणूक करुन,शुभम पसारकर यांना गौरविण्यात आले आहे.

नगराध्यक्ष गिता लिंगायत,उपाध्यक्ष संजय नवघडे,मुख्याधिकारी अर्चना वंजारी यांच्या स्वाक्षरी असलेले,पर्यावरण दूत नियुक्ती गौरव प्रमाणपत्र,नगरपरिषद चिमूर येथे शुभम पसारकर यांना देण्यात आले.

# वारकऱ्यांनो...नाथषष्ठीत यांच्यापासून सावधान..!



दैनिक वादळ वार्ता
**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

पैठण येथे नाथ षष्ठी यात्रा महोत्सव ९ ते ११ मार्च या तीन दिवसीय काळात संपन्न होणार आहे यानिमित्त राज्यातून लाखो भाविक व वारकरी नाथनगरीत दाखल होणार असल्याने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनातर्फे विशेष काळजी घेतली जात आहे मागील अनुभव पाहता नाथषष्ठीत छोट्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी वारकरी भाविकांना जागृत करण्यासाठी पोलीस प्रशासनातर्फे नाथ मंदिर परिसर यात्रा मैदान बस स्थानक परिसरात व शहरातील विविध गर्दीच्या ठिकाणी महिला व पुरुष चोरट्यांचे फोटो असलेले डिजिटल लावले आहेत

## शेळगाव ग्रामपंचायतीचा पुणे जिल्ह्यात डंका उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते गौरव!



दैनिक वादळ वार्ता
**शेळगाव । प्रतिनिधी**

पंतप्रधान आवास योजना-ग्रामीण (PMAYAG) अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'महा आवास अभियान २०२३-२४' मध्ये शेळगाव ग्रामपंचायतीने घवघवीत यश संपादन केले आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून शेळगावची निवड करण्यात आली असून, आज दिनांक ७ मार्च २०२६ रोजी या पुरस्काराचे दिमाखदार वितरण करण्यात आले.पुण्यातील शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालय प्रांगणात दुपारी ४ वाजता हा विशेष सोहळा पार पडला. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभहस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. शेळगाव ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी मा. चंद्रकांत बापुराव जगताप यांनी हा पुरस्कार स्वीकारला.लोकसहभाग आणि पारदर्शकतेचा विजयगरिबांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी शेळगाव ग्रामपंचायतीने राबविलेली गतिमान प्रक्रिया, लाभार्थ्यांची अचूक निवड आणि गुणवत्तापूर्ण कामाची दखल राज्य शासनाने घेतली आहे. या पुरस्कारामुळे शेळगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून तालुक्यातून ग्रामपंचायतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अनधिकृत फेरीवाल्यांवर तात्काळ आणि कठोर कारवाई करा-महागरपालिका आयुक्त श्री.भूषण गगराणी यांचे निर्देश

## जमावाने केलेल्या हल्ल्यास सामोरे गेलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचीही घेतली भेट

### कांदिवली येथील निष्कासन कारवाईप्रकरणी श्री.गगराणी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन केली पाहणी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज कांदिवली परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करतेवेळी जमावाने महागरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना केलेल्या मारहाणप्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. भूषण गगराणी यांनी आज (दिनांक ८ मार्च २०२६) प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच, कारवाई करणाऱ्यां पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. दरम्यान, परिसरातील सर्व अनधिकृत फेरीवाले तसेच पदपथावर अडथळा निर्माण करणाऱ्या दुकानदारांवर तात्काळ आणि कठोर कारवाई करावी, असे निर्देश श्री. गगराणी यांनी यावेळी दिले.आज उपायुक्त (परिमंडळ ७) डॉ. (श्रीमती) भाग्यश्री कापसे, सहायक आयुक्त (आर दक्षिण विभाग) श्रीमती आरती गोळेकर, महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी आणि पोलीस अधिकारीही यावेळी उपस्थित होते.आज बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आणि अनधिकृत फेरीवाल्यांवर वेळोवेळी कारवाई केली जाते. याच अनुषंगाने, कांदिवली येथील श्री. विश्वकर्मण्ये चौक (लोखंडवाला सर्कल) परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर (दक्षिण) विभागाकडून काल (दिनांक ७ मार्च २०२६) निष्कासनाची कारवाई करण्यात आली. ही कारवाई सुरू असताना जमावाकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली. तसेच, संयंत्रे आणि वाहनांची तोडफोड करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. भूषण गगराणी यांनी आज कांदिवली येथील श्री. विश्वकर्मण्ये चौक (लोखंडवाला सर्कल) परिसरात भेट देऊन पाहणी केली. रस्त्यावर उभी करण्यात आलेली वाहने, पदपथांवर निर्माण झालेले अडथळे हे महानगरपालिका आयुक्त श्री. गगराणी यांनी प्रत्यक्ष उभे राहून निष्कासित कायला लावले. तसेच, डिलिव्हरीच्या दुचाकी उभ्या करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या पिझ्झा दुकानाला तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले. श्री. गगराणी यावेळी म्हणाले की, अनधिकृत फेरीवाले आणि पदपथावर अनधिकृतपणे करण्यात येणाऱ्या बांधकामांमुळे वाहतुकीस तसेच पादचाऱ्यांना मार्गक्रमण करण्यास अडथळा निर्माण होतो. आज तथापि, महानगरपालिकेकडून त्यांच्याविरोधात सातत्याने कारवाई केली जाते. मात्र, नियमानुसार कारवाई करून सेवा बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर अशाप्रकारे हल्ला करणे हे निंदनीय आहे. प्रशासनाकडून या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे. हल्ला करणाऱ्या जमावात अनधिकृत फेरीवाल्यांसोबत काही स्थानिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचाही सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्या संबंधित महाविद्यालयांना याबाबत सूचना देऊन कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.दरम्यान, वाहतुकीस तसेच पादचाऱ्यांना मार्गक्रमण करण्यास अडथळा निर्माण करणारे अनधिकृत फेरीवाले आणि पदपथावर अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्यांविरोधी निष्कासनाची कारवाई यापुढेदेखील सुरूच राहील, असे देखील श्री. गगराणी यांनी यावेळी स्पष्ट केले.



# जागतिक महिला दिन: उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत राज्यात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

### लाखो मुलींना गर्भाशयमुख कर्करोगापासून मिळणार संरक्षण

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

जागतिक महिला दिनाच्या (८ मार्च) निमित्ताने महाराष्ट्र सरकारने महिलांच्या सुरक्षेसाठी आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आज या राज्यातील १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्षे पूर्ण न झालेल्या ९ लाख ८४ हजार मुलींना गर्भाशयमुख कर्करोग (सर्वायकल कॅन्सर) प्रतिबंधासाठी राज्यव्यापी एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मानही करण्यात आला.आज कार्यक्रमाला आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, उपमहापौर संजय घाडी, माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत, आरोग्य सचिव विनायक निपुण, आयुक्त कादंबरी बलकवडे, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, विजय कंदेवाड आदी मान्यवर



उपस्थित होते. आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आला.तसेच उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या वेळी भाष्य करताना सांगितले की, खासगी दवाखान्यात अनावश्यक सिझेरियन होत असताना प्राथमिक आरोग्य केंद्रांनी फक्त आवश्यकतेनुसारच सिझेरियन करण्याची संकल्पना आदर्श आहे. गेल्या तीन-चार वर्षांत आरोग्य विभागाला नवसंजीवनी मिळाली आहे. कोविड काळात खासगी दवाखाने बंद झाल्याने लोकांना शासकीय आरोग्य केंद्रे 'हिरो'सारखी वाटू लागली. आरोग्य विभागाने पुनर्जीवन घेतले आणि ऐतिहासिक बदल घडवून आणला.तसेच एचपीव्ही लसीकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रेरणा असल्याचे सांगताना त्यांनी हे पाऊल महिलांच्या सक्षमीकरणासह आरोग्य सुरक्षिततेसाठी आज महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले. महिला दिनाच्या दिवशी महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची सुरुवात राज्य सरकारने केली आहे, असे ते म्हणाल्या.डॉ. गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, आरोग्य आणि हिंसाचार यांचे जवळचे नाते आहे. मुलगा न होणे, मासिक पाळी दरम्यान दुजाभाव यासारख्या गोष्टी दिसतात. गेल्या २२ वर्षांत UNAPA, कैरो परिषदेनंतर धोरणे, SOP, कायदे (MTP कायद्यात बदल, १६ आठवड्यानंतर गर्भपातासाठी बदल) आले तरी पोलीस व इतर विभागांना त्याची कमी माहिती आहे. याबाबत जागृती आवश्यक आहे. महिलांच्या आरोग्य हक्कांसाठी आणि दुजाभाव रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या भूमिका एकत्रितपणे मांडल्या पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.ही मोहीम तीन महिन्यांत राबवली जाणार असून, 'गार्डसिल-४' लसीचा एक मोफत डोस मुलींना दिला जाणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील लाखो मुलींना भविष्यातील गर्भाशयमुख कर्करोगाच्या धोक्यापासून संरक्षण मिळणार आहे.

# जानेगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि. ८ मार्च २०२६ रोजी हनुमान मंदिर जानेगाव येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा सुंदर असा कार्यक्रम येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला तालुकाध्यक्ष शितलताई लांडगे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला. यावेळी माता क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले गावातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला महिला दिनाचे औचित्य साधून केक कापून घोषणा देण्यात आल्या. मान्यवरांनी आपापले विचार मांडले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीक्षा चटप व शुभांगी कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा शितलताई लांडगे यांनी महिलांना संबोधित केले यावेळी त्यांनी सांगितले की,आजच्या युगात महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपले अस्तित्व तयार करावे,आपली नवीन ओळख निर्माण करावी स्वतःआर्थिक,सामाजिक,शारीरिक आणि शैक्षणिक रित्या सक्षम व्हावे महिला सक्षमी करणासाठी येडेश्वरी फाउंडेशन आपल्या सदैव पाठीशी आहे असा शब्द आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने त्यांनी महिला भगिनींना दिला.प्रमुख पाहुणे म्हणून सीआरपी सोनिया चटप मॅडम, उमेदच्या सीआरपी कांबळे मॅडम,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्या सिंधुताई पारवे,उमा मॅडम,मायाताई कसबे रागिनीताई वाघमारे व गावातील मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रम संपन्न झाला.

# श्री स्वामी समर्थ केंद्रात महिला दिनानिमित्त महिला गुणगौरव व रोग निदान शिबिराचे आयोजन


## महिलांनी सहभाग नोंदविण्याचे श्री स्वामी समर्थ केंद्राकडून आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**मुखेड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणीत) नागेंद्र मंदिर, मुखेड यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नारी तू नारायणी - महिला गुणगौरव व रोग निदान शिबिर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम रविवार, दिनांक ८ मार्च रोज रविवारी सकाळी १०.३० वाजता श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, नागेंद्र मंदिर, मुखेड (जि. नांदेड) येथे होणार आहे. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात येणार आहे.शैक्षणिक क्षेत्रात कर्तव्यदक्षपणे कार्य करणाऱ्या महिला, स्वयंसेविका, वैद्यकीय क्षेत्रातील सेवा देणाऱ्या महिला तसेच समाजात स्वबळावर कर्तृत्ववान विद्यार्थी घडविण्याचे कार्य करणाऱ्या महिलांची निवड



करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. समाजातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या विविध विभागांतील महिलांच्या योगदानाचा गौरव करण्याचा हा उपक्रम आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महिला रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सौ. सुचिता महेंद्रकर-ढगे (नांदेड) यांच्या प्रमुख उपस्थितीत महिलांची तपासणी करण्यात येणार असून, महिलांसाठी मोफत रक्त तपासणी व औषध वितरण करण्यात येणार आहे. महिला आरोग्य, सन्मान आणि सक्षमीकरण या तिन्ही गोष्टींचा विचार करून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील सर्व महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ७०५८३०७२१४ व ९८६०३५२१३३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

# पवनचक्की प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांवर अन्याय; मनसेकडून चौकशीची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील विविध गावांमध्ये उभारण्यात येत असलेल्या पवनचक्की प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे लातूर जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे यांनी केला आहे. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी विविध गंभीर मुद्दे मांडत प्रशासनाकडे चौकशीची मागणी केली.नागराळे यांनी सांगितले की, तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पवनचक्की प्रकल्पांसाठी अत्यंत कमी दरात भाडेपट्ट्यावर घेतल्या जात आहेत. तसेच प्रत्येक शेतकऱ्याला वेगवेगळ्या दराने मोबदला देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. याशिवाय देण्यात येणाऱ्या भाड्यातून टीडीएसच्या नावाखाली कपात करण्यात येत असल्याची तक्रारही त्यांनी केली.काही कंपन्या करारानुसार घेतलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक जमीन वापरत असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. मात्र या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना



कोणताही मोबदला दिला जात नसल्याचेही त्यांनी नमूद केले.पवनचक्की प्रकल्पांसाठी रस्ते तयार करताना मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज (मुरूम) उपसा होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे शासनाचा महसूल बुडत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच हजारो झाडांची विनापरवाना तोड होत असल्याने पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.भू-अभिलेख विभागाकडून जमिनीची प्रत्यक्ष मोजणी न करता केवळ नोटिसा पाठवून औपचारिकता पूर्ण केल्याचा आरोप करत संबंधित विभागाच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय उपभाडेपट्टे तयार करून दलालांकडून अतिरिक्त रक्कम उकळली जात असल्याचाही आरोप करण्यात आला.शेतकऱ्यांनी अन्यायाविरोधात आवाज उठवल्यास पोलिसांच्या माध्यमातून दबाव टाकला जात असल्याचा आरोप करत पोलिस प्रशासनाने शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली. यापुढे शेतकऱ्यांवर अन्याय झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अन्याय ग्रस्त शेतकऱ्यांना सोबत घेऊन कंपनीचे प्रतिनिधी व दलालांच्या तोंडाला काळे फासून धिंड काढण्यात येईल असा इशाराही शिवकुमार नागराळे यांनी पत्रकार परिषदेत दिला.या पत्रकार परिषदेस मनसेचे कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीच्या शासनातर्फे करण्यात येणा-या पूर्वतयारीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची यंदा १३५ वी जयंती साजरी होत असून राज्य शासनातर्फे भिमजयंतीच्या केलेल्या पूर्वतयारीचा आढावा आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सहयाद्री अतिथीगृह मलबार हिल येथे आयोजित शासकिय बैठकीत घेतला. यावेळी पोलीस, रेल्वे पोलीस, मुंबई महापालिका, राज्य शासनाच्या समाज कल्याण विविध विभांगाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पुज्य भंते डॉ. राहुलबोधी महाथेरो, माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, समन्वय समितीचे नागसेन कांबळे, रिपाइंचे मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, राजेंद्र जाधव ; प्रकाश मोरे, दयाल बहादुरे, सुरेश बारसिंग, उषाताई रामलु, कामगार नेते रमेश जाधव, प्रकाश जाधव, शिवसेनेचे नेते रवि गरुड, रिपाइंचे घनश्याम चिरणकर आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमीत्त मुंबईत चैत्यभूमी येथे, नागपुरमधील दिक्षाभुमी यासह राज्यभरांतील विविध स्मारकात राज्य शासनातर्फे पुरविण्यात येणा-या विविध सेवा सुविधा आणि सुरक्षेच्या तयारीचा ना. रामदास आठवले यांनी आढावा घेतला. मुंबईत चैत्यभूमी तसेच गोराई येथील पॅगोडा येथे भिमजयंती निमीत्त हजारो बौध्द उपासक, भिम अनुयायी भेट देतात. त्यांच्या सुरक्षेचा विविध सुख सुविधा पुरविण्याबाबत ना. रामदास आठवले यांनी माहिती घेतली. १४ एप्रिल रोजी चैत्यभूमी येथे दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात नामवंत कलाकारांसह आंबेडकरी चळवळीतील भिमशाहीरांनाही आंबेडकरी लोक कलावंताना संधी देण्याची सुचना करण्यात आली. तसेच भिमजयंती निमीत्त चैत्यभूमी येथे १४ आणि १५ एप्रिल रोजी कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी राज्य शासनातर्फे देण्यात यावी. याबाबत आपण जिल्हाधिका-यांना पत्र पाठवणार असल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077